# मिरा भाईंदर महानगरपालिका

जा.क्र.माअधि/अपिल/ 08 /२०१९-२०
प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य लेखापरीक्षक
मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प)
ता.जि.ठाणे-४०१ १०१, दुरध्वनी क्र : २८१९२८२८
Email.Id:- mbmcaudit@gmail.com
मुख्य लेखापरीक्षक यांचे कार्यालय
जा.क्र.मनपा/मुलेप/ 24 /2019-20
दि.२८ / ०६ /2019

O/C.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्यलेखापरीक्षक मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेसमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.

श्री. संतोष लोहकरे
1, इवरेस्ट हिल,
सिध्दी विनायक हॉस्पीटल,
नवघर रोड, भाईंदर (पु)

......अपिलार्थी

विरुध्द

जनमाहिती अधिकारी तथा
सहा.लेखापरीक्षक, लेखापरीक्षण विभाग

......प्रतिवादी

## :- विवेचन :-

अपिलार्थी श्री. संतोष लोहकरे पत्ता 1, इवरेस्ट हिल, सिध्दी विनायक हॉस्पीटल, नवघर रोड, भाईंदर (पु) यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार मिरा भाईदर महानगरपालिके मध्ये झालेल्या 41 कोटी कर थकबाकी घोटाळा बाबतच्या माहितीची मागणी केलेली होती. त्याअनुषंगे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम 6(3) दोन अन्वये सदर माहिती अर्ज जनमाहिती अधिकारी कर यांचेकडे दि.04/05/2019 रोजी वर्ग करण्यात आलेला आहे. तथापि श्री.संतोष लोहकरे यांनी दि.21/06/2019 रोजी प्रथम अपिल

मुख्य लेखापरीक्षक यांच्या कार्यालयात दाखल केले असुन सदर अपिलाची सुनावणी दि.29/06/2019 रोजी दुपारी 12.00 वाजता ठेवण्यात आली होती.

**अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचा तपशिल:-**

मिरा भाईदर महानगरपालिके मध्ये झालेल्या 41 कोटी कर थकबाकी घोटाळा बाबतची संपुर्ण माहिती..

**अपिल दाखल करण्याचे कारण:-**

माहिती अधिकारात मागितलेली माहिती प्राप्त न झाल्याने अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा सहा. लेखापरीक्षक यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.29/06/2019 रोजी दुपारी 12.00 वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र/मनपा/मुलेप/20/2019-20 दि.21/06/2019 रोजी पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानुसार सदर सुनावणीस खालीलप्रमाणे अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

१) श्री. संतोष लोहकरे (अपिलार्थी)

२) जनमाहिती अधिकारी तथा सहा. लेखापरीक्षक, लेखापरीक्षण विभाग

**जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तीवाद:-**

जनमाहिती अधिकारी तथा सहा. लेखापरीक्षक यांनी अर्जातील विषय लेखापरीक्षण विभागासंबंधी नसल्याने सदर माहिती अर्ज कर विभागास वर्ग केलेला आहे.

**अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तीवाद :-**

अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान आपल्या युक्तीवादामध्ये माहिती अधिकार अर्जान्वये मागणी केलेली माहिती विभागाकडुन मिळाली नसल्याचे सांगितले.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

-:निर्णय:-

जनमाहिती अधिकारी लेखा परीक्षण विभाग यांनी अपिलार्थीने अपेक्षिलेली माहिती लेखा परीक्षण कार्यालयाशी निगडीत नसल्यामुळे माहिती अर्ज जनमाहिती अधिकारी कर विभाग यांच्याकडे वर्ग केलेला आहे. तथापि, अपिलार्थी यांना अपिलाच्या दिनांकापर्यंत माहिती देण्यात आलेली नाही. जनमाहिती अधिकारी कर विभाग यांनी अपिलार्थी यांना अपेक्षिलेली माहिती तात्काळ पुरविण्यात यावी.

उपरोक्त निर्णयाप्रमाणे सदर अपिल अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

सदर आदेशाविरुध्द अपिल करावयाचे असल्यास मा. राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, 5 वा मजला, दालन क्र.528, कोकण भवन, सी. बी.डी. बेलापुर, नवी मुंबई -400614 यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासुन 90 दिवसांच्या आत अपिल दाखल करता येईल.

२८.०६.१९

(दिग्विजय चव्हाण)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मुख्यलेखापरीक्षक
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति

1) श्री. संतोष लोहकरे
1, इवरेस्ट हिल,
सिध्दी विनायक हॉस्पीटल
नवघर रोड, भाईंदर (पु)

2) जनमाहिती अधिकारी तथा सहा. लेखापरीक्षक
लेखापरीक्षण विभाग

3) जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख कर, कर विभाग. 01/7/2019

भारतीय डाक
India Post

EM798793544IN IVR:6977798793544
SP BHAYANDER WEST S.O <401101>
Counter No:6,03/07/2019,11:30
To:SANTOSH LOHKARE,BHY E
PIN:401105, Bhayander East S.O
From:MIRA BHAYANDER MAHANAGR,BHYW
Wt:15gms
Amt:17.70(Cash)Tax:2.70
<Track on www.indiapost.gov.in>
<Dial 1800 266 6868>